**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी एड प्रशिक्षणा थर्यांना समकालीन भारतीय शिक्षण , लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेची निर्मिती व परिणामकारकतेचा अभ्यास**

**प्रा .कैलास आर .खोंडे , Ph. D.**

*(असि .प्रोफेसर) मविप्र समाज , शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक E – Mail : krkhonde81@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

1. **प्रास्ताविक**

**दैनंदिन अध्यापनात शिक्षक विविध अध्यापन पद्धतींचा वापर करत असतो त्या पद्धती प्रामुख्याने शिक्षक केंद्रित असतात तसेच सर्व पद्धतींमध्ये अध्यापनावर लक्ष दिले जाते परंतु अध्यापन शास्त्राचा विचार केला असता शिक्षकांना विद्यार्थी केंद्रित कार्यनीतीचा विचार करावा लागेल, तसेच प्रामुख्याने अध्ययनावर भर दिला गेला पाहिजे असे संशोधकांना वाटते .अध्ययन प्रक्रिया ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, अध्ययन प्रक्रिया औपचारिक अनौपचारिक तसेच सहशिक्षण या प्रकारची असते यापैकी अनौपचारिक शिक्षण प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्त्व आहे .शिक्षणातील प्रत्येक स्तराचा विचार करता शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते या समस्या काही प्रमाणात कमी होणे आवश्यक आहे.विषयाबद्दल अभिरुची अभिवृत्ती विकसित करण्यासाठी या विषयातील मूलभूत संकल्पना शिक्षकांनी समजावून दिल्या पाहिजे व त्या संकल्पनांची आकलन क्षमता वाढावी यासाठी प्रशिक्षणार्थींना स्वयंअध्ययन पुस्तिकेचे मदत होईल असे संशोधकांना वाटते.**

2. **संशोधनाची गरज**

1. **प्रशिक्षणार्थींना समकालीन भारतीय शिक्षण ,लिंगभेद आणि समाज हा अनिवार्य विषय आहे. संशोधकांना असे वाटते की ,या विषयाच्या अध्ययनासाठी बहुतांश संदर्भ ग्रंथांचा वापरणे आवश्यक आहे.**

2. **बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांना पाठ्यपुस्तक वापरण्याची सवय असल्यामुळे ते संदर्भ पुस्तकांचा वापर करत नाही महाविद्यालयात अनेक प्रकारचे संदर्भग्रंथ उपलब्ध असतात मात्र उपलब्ध वेळेचा विचार करता हे एकत्रित स्वरूपात वापरता येत नाहीत, म्हणून सर्व संदर्भ ग्रंथांचा अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने एकत्रित एका दृष्टिक्षेपात सर्व मसुदा तयार केला त्यासाठीची अध्ययन पुस्तिका तयार केली तर विद्यार्थ्यांचा वेळ आणि श्रम वाचेल व विद्यार्थ्यांना एका दृष्टिक्षेपात त्या विषयाचा अभ्यास करणे सोपे जाईल, म्हणून प्रस्तुत संशोधन करणे गरजेचे वाटले . अध्ययन पुस्तिकेचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना कसा फायदा झाला यासाठी प्रस्तुत संशोधन करावेसे वाटले.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

3. **संशोधनाचे महत्त्व**

**प्रस्तुत समस्याही बी एड स्तरावरील समकालीन भारतीय शिक्षण, लिंगभेद व समाज या विषयाशी संबंधित आहे. या विषयाच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रशिक्षणार्थींना बऱ्याच अडचणी असतात त्यांचे निराकरण करण्यासाठी स्वयं अध्ययन पुस्तकेचा वापर परिणामकारक ठरेल . प्रस्तुत अध्ययन पुस्तिकेचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल व अनेक संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यासाठी व उपलब्ध करण्यासाठी जो श्रम व वेळ अपव्यय होतो ,त्याची बचत होईल त्यामुळे विद्यार्थ्यांना परिणामकारक अध्ययन करण्यास मदत होईल .**

4. **समस्या विधान**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी एड प्रशिक्षणार्थ्यांना समकालीन भारतीय शिक्षण , लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनासाठी अध्ययन पुस्तिकेची निर्मिती करणे व परिणामकारकतेचा अभ्यास करणे.**

5. **संशोधन समस्येचे स्पष्टीकरण**

**बी एड प्रशिक्षणार्थींना समकालीन भारतीय शिक्षण आणि समाज या विषयाचे अध्ययन अवघड जाते,प्रशिक्षणार्थींना अध्ययन करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते अशा अडचणी प्रशिक्षणार्थींना अध्ययन प्रक्रियेदरम्यान निर्माण होऊ नये यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते म्हणून संशोधकाला वाटते की विद्यार्थ्यांच्या समस्या लक्षात घेता त्यांना अनेक संदर्भ ग्रंथ ऐवजी एकाच दृष्टिक्षेपात येईल असा संदर्भ तयार करणे स्वयं अध्ययन पुस्तिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा वेळ व श्रम वाचवणे या हेतूसाठी प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले होते.**

6. **संकल्पनात्मक व्याख्या**

1. **बी. एड. प्रशिक्षणार्थी**

**शिक्षकाच्या व्यवसायासाठी सामान्यतः पदवी शिक्षणानंतर करता येणारे प्रशिक्षण व ते देणारी व्यक्ती म्हणजे शिक्षक किंवा बी. एड. प्रशिक्षणार्थी होय.** (,**शैक्षणिक संशोधन मांडणी व दिशा , हेमंत चित्ते** )

2. **समकालीन भारतीय शिक्षण लिंगभेद आणि समाज**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बी. एड. अभ्यासक्रम** 2015 **या सुधारित अभ्यासक्रमातील प्रथम वर्षासाठी असलेला एक अनिवार्य विषय.**(**बी. एड.जनरल अभ्यासक्रम सुधारित आवृत्ती** 2015 **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे**)

3. **स्वयंअध्ययन पुस्तिका**

**स्वप्रयत्नाने केलेल्या अध्ययनास स्वयंअध्ययन असे म्हणतात आणि स्वयं अध्ययनात मार्गदर्शन करणारी पुस्तिका म्हणजे स्वयंअध्ययन पुस्तिका होय.** (**शिक्षण समीक्षा म.बा. कुंडले**)

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

4. **परिणामकारकता**

**परिणामकारकता म्हणजे अचूक आणि योग्य ते काम करणे ,आपल्या अथवा एखाद्या उपक्रमाचा एखाद्या घटकावर पडणारा धनात्मक प्रभाव होय**. (**सर अँटनी जे ,स्कॉलर, गूगल डॉट कॉम**)

7. **कार्यात्मक व्याख्या**

1. **बी. एड. प्रशिक्षणार्थी**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षकांच्या व्यवसायासाठी प्रशिक्षण देणारी व्यक्ती म्हणजे बीएड प्रशिक्षणार्थी**

2. **स्वयंअध्ययन पुस्तिका**

**शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींनी स्वतः अध्ययन करावे  या हेतूने विकसित केलेली पुस्तिका**

3. **परिणामकारकता**

**समकालीन भारतीय शिक्षण ,लिंगभेद आणि समाज या विषयाच्या स्वयं अध्ययनात कार्यपुस्तिका वापरल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन  क्षमतेत होणारी  वाढ**

8. **संशोधन प्रश्न**

1. **बी. एड. प्रशिक्षणार्थींना समकालीन भारतीय शिक्षण**, **लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनात अडचणी येतात का**?

2. **कोणकोणत्या उपाययोजना राबविल्या  असता प्रस्तुत विषयाचे अध्ययन परिणामकारक होईल**?

3. **बी एड प्रशिक्षणार्थींच्या समकालीन भारतीय शिक्षण**, **लिंगभेद आणि समाज या विषयासाठी तयार केलेली स्वयंअध्ययन पुस्तिका परिणामकारक होईल का** ?

9. **संशोधनाची उद्दिष्टे**

1. **बी. एड. प्रशिक्षणार्थींच्या समकालीन भारतीय शिक्षण**, **लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेची निर्मिती करणे**.

2. **बी एड प्रशिक्षणार्थींच्या समकालीन भारतीय शिक्षण** , **लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेची परिणामकारकता अभ्यासणे**.

10. **संशोधनाची गृहितके**

1.**समकालीन भारतीय शिक्षण ,लिंगभेद आणि समाज या विषयासाठी अनेक संदर्भग्रंथातून विशिष्ट विषयाची अचूक व मुद्देसूद  टिपणे काढताना प्रशिक्षणार्थींना अडचणी येतात**.

2.**बी एड प्रशिक्षणार्थ्यांना शिक्षणाचे प्रकार पारंपरिक पद्धतीने अध्यापन केल्यावर समजत नाहीत** .

3. **बी एड प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक समस्या व शिक्षणाचे धोरण अध्ययन करताना अडचणी येतात**.

11. **संशोधन परिकल्पना**

1. **संशोधन परिकल्पना**

**जर शिक्षणशास्त्र महाविद्‍यालयातील प्रशिक्षणार्थींनी समकालीन भारतीय शिक्षण ,लिंग आणि समाज विषयाच्या अध्यापनासाठी स्वयंअध्ययनपुस्तिकेचा वापर केला तर त्यांच्या संपादन पातळीत वाढ होईल.**

2. **शून्य परिकल्पना**

**जर शिक्षणशास्त्र महाविद्‍यालयातील प्रशिक्षणार्थींनी समकालीन भारतीय शिक्षण , लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेचा वापर केला तरी त्यांच्या अध्ययनात परिणामकारक संपादन होत नाही.**

12. **संशोधनाची चले**

1. **स्वाश्रयी चल : स्वयंअध्ययन पुस्तिका**

2. **आश्रयी चल : बी एड प्रशिक्षणार्थीचे समकालीन भारतीय शिक्षण, लिंगभेद आणि समाज या विषयाचे अध्ययन**

13. **व्याप्ती मर्यादा व परीमर्यादा**

1. **संशोधनाची व्याप्ती**

1. **प्रस्तुत संशोधन सावित्रीबाई फुले पुणे विद्‍यापीठांतर्गत येणाऱ्या बी. एड. प्रशिक्षणार्थीसाठी व्याप्त आहे.**

2.**प्रस्तुत संशोधन नाशिक जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्‍यालयशी संबंधित आहे.**

3. **प्रस्तुत संशोधन हे बी. एड. प्रशिक्षणार्थींच्या समकालीन भारतीय शिक्षण, लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनासाठी आहे.**

2. **संशोधनाची मर्यादा**

1. **प्रस्तुत संशोधन नाशिक जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्‍यालयापुरतेच मर्यादित आहे.**

2 **प्रस्तुत संशोधन समकालीन भारतीय शिक्षण लिंगभेद आणि समाज यातील तत्त्वज्ञानावर आधारित घटकांपुरतेच मर्यादित आहे.**

3. **संशोधन परीमर्यादा.**

1. **प्रस्तुत संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्‍यालयातील एका तुकडी पुरतेच मर्यादित आहे.**

2. **प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष संबंधित तुकडीतील विद्‍यार्थ्यांना लागू राहतील.**

14. **संबंधीत साहित्य व संशोधनाचा आढावा**

**प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे आढावे घेण्यात आले.**

**संबंधित संशोधन साहित्याच्या आढाव्यासाठी** 14 **संदर्भ ग्रंथांचा वापर केला.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**त्याचप्रमाणे पीएचडी स्तरावर** 3 **संशोधन प्रबंध**, **एम फिल स्तरावर** 2 **संशोधन प्रबंध व एम एड स्तरावरील** 1 **संशोधन अहवालाचा आढावा घेण्यात आला**.

15. **संशोधन पद्धती**

**प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर केला**.

16. **संशोधनाची जनसंख्या**

**बी एड प्रथम वर्षातील तुकडी क** 93 **विद्यार्थी**.

17. **संशोधन नमुना**

**बी**. **एड**.**प्रथम वर्षातील तुकडे क चे** 33 **प्रशिक्षणार्थी**

**नमुना निवड पद्धती** : **लॉटरी पद्धत**

18. **संशोधन अभिकल्प एकलगट अभिकल्प**

19. **संशोधनाची साधने** : **स्वयंअध्ययन पुस्तिका व संपादन चाचणी**

20. **संख्याशास्त्रीय विश्लेषण**:

**प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमांत ,प्रमाण विचलन व टी परीक्षिका या संख्याशास्त्रीय परिणामांचा उपयोग केला आहे**.

21. **उद्दिष्टानुसार निष्कर्ष**:

1.**बी एड प्रशिक्षणार्थींच्या समकालीन भारतीय शिक्षण ,लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेची निर्मिती करणे**.

2.**बी एड प्रशिक्षणार्थींच्या समकालीन भारतीय शिक्षण ,लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिकेची परिणामकारकता अभ्यासणे**.

**निष्कर्ष**

**पूर्व चाचणीचे मध्यमान** 10. 50 **आहे तर पूर्वोत्तर चाचणीचे मध्यमान** 20.66 **आहे**.

**वरील आकडेवारीवरून असे लक्षात येते की, पूर्वोत्तर चाचणीतील मध्यमानात वाढ झालेली दिसून येते याचा अर्थ संशोधकाने तयार केलेली स्वयंअध्ययन पुस्तिका बी एड प्रशिक्षणार्थीसाठी उपयुक्त आहे, त्यामुळे संशोधन परीकल्पनेचा स्वीकार केला आहे आणि शून्य परिकल्पनेचा त्याग केलेला आहे**.

**मुख्य निष्कर्ष** :

**पूर्वचाचणी व उत्तर चाचणीतील मध्यमानातील फरक** 10.16 **आहे**. **टी मूल्य** 10.58 **असल्यामुळे** 0.05 **स्तरावर मध्यमानातील फरक सार्थ आहे .तो योग्य पद्धतीने सांख्यिकी परिमाणे वापरुन काढला आहे म्हणून बी**. **एड**.**प्रशिक्षणार्थींच्या अध्ययनासाठी स्वयंअध्ययन पुस्तिका परिणामकारक आहे**.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

22. **शिफारसी**

**शिक्षकांसाठी शिफारसी**

1.**प्रशिक्षणार्थींना समकालीन भारतीय शिक्षण, लिंगभेद आणि समाज या विषयाच्या अध्ययनात गोडी निर्माण व्हावी यासाठी स्वयंअध्ययन साहित्याची निर्मिती करावी.**

2. **विषयाचे अध्यापन करताना शिक्षकांनी जास्तीत जास्त उदाहरणांचा समावेश करावा.**

3. **प्रशिक्षणार्थी मध्ये स्वयंअध्ययनाची गोडी निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी विविध उपक्रम राबवावेत.**

**प्रशिक्षणार्थींसाठी शिफारसी**

1. **प्रशिक्षणार्थींनी स्वयं अध्ययनाची सवय लावावी.**

2.**प्रशिक्षणार्थी भावी शिक्षक असल्याने प्रशिक्षणार्थींनी तत्वज्ञानाचे सखोल अध्ययन करावे.**

3. **स्वयंअध्ययन पुस्तिका वापरताना प्रशिक्षणार्थी ने स्वयअध्ययानात महत्त्वाचे स्थान देऊन कठीण वाटणाऱ्या भागावर शिक्षकांकडून मार्गदर्शन घ्यावे व आपली प्रगती साधावी.**

***संदर्भसूची***

***मराठी संदर्भ***

*आगलावे, प्र. (2000 ) संशोधन पद्धती, शास्त्र व तंत्र ,नागपूर : विद्या प्रकाशन.*
*अवघडे, रे. (2009) भारतीय शिक्षण, अंक 7, जुलै : पृष्ठ क्रमांक 38 ते 41.*
*कदम, चा .प. ( 1994) शैक्षणिक संख्याशास्त्र ,पुणे : नूतन प्रकाशन*
*दूनाखे, अरविंद. (2005) प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान, पुणे : नित्य नूतन प्रकाशन*
*देशपांडे ,वसंत .व महाले, संजीवनी . (2008) अध्यापन आणि अध्यापक शिक्षण, नाशिक : शिक्षक प्रशिक्षण प्रकाशन*
*बोरसे ,चंद्रकांत. व दौंड, गोरख. (2009) अनुदेशन प्रणाली ,नाशिक : नेहा प्रकाशन प्रथमावृत्ती*
*भिंताडे, वि.रा. ( 2008) शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नित्य नूतन प्रकाशन*
***इंग्रजी संदर्भ*** :
*Garrett H E (2005 )Statistics in Psychology and Education, New Delhi: Paragon international*
*Best ,J .W. and Kahn, J.V. (1998 )Research in Education New Delhi : Prentice Hall Delhi.*